प्रेस नोट

दिनांक -२९/०८/२०१८.

# मिरा रोड, सजा मिरे येथील तलाठयास लाच स्विकारताना अटक

दिनांक २८/०८/२०१८ रोजी मिरारोड, सजा मिरे येथील तलाठी **बसवराज गुन्जीते** यांना तक्रारदार यांच्याकडून १,००,०००/- रुपयांची लाच स्विकारताना रंगहात पकडण्यात आले. त्याबाबत थोडक्यात हकिकत खालीलप्रमाणे.

यातील तक्रारदार यांच्या रुपांतरीत कराची नोंद ७/१२ च्या उताऱ्यावर घेण्यासाठी व फेरफार नोंद घेण्यासाठी यातील लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे २,००,०००/-रुपये लाचेची मागणी केली होती. तडजोडीअंती १,००,०००/- रुपये देण्याचे ठरले. सदरबाबत तक्रारदार यांनी असेबी, ठाणे येथे तक्रार नोंदविली होती.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पडताळणी केली असता, वरील नमुद लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्यावरून असेबी, ठाणे युनिटने सापळयाचे आयोजन करून लोकसेवक **बसवराज गुन्जीते** यांना तक्रारदार यांच्याकडून १,००,०००/- रुपयाची लाच स्विकारताना रंगेहात पकडण्यात आले असुन, गुन्हयाचा पुढील तपास श्रीमती वैशाली रासकर, पोलीस निरीक्षक, असेबी, ठाणे या करत असुन त्यांचा संपर्क क्रमांक ८४२४९६३४१४ असा आहे.

**शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कार्यालयास खालील दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावाा.**

---

१) टोल फ्री :- १०६४

२) दुरध्वानी क्रमांक :- ०२२/२५४२७९७९

३) ई-मेल आयडी :- spacbthane@mahapolice.gov.in

४) वोबसाईट :- www.acbmaharashtra.gov.in

Scanned by CamScanner